**मे. ग्रँड वेस्टर्न डिस्टीलरी प्रायव्हेट लिमिटेड, गट क्रमांक ई-१२/१, एम.आय.डी.सी. शिराळा, ता शिराळा, जिल्हा सांगली यांच्या प्रस्तावित ८० के.एल.पी.डी. धान्य आधारीत आसवणी प्रकल्प, १० के. एल. पी. डी. माल्ट स्पिरिट आसवणी प्रकल्प, व आय.एम.एफ.एल. (Indian Made Foreign Liquor) आणि कंट्री लिकर उत्पादन प्रकल्पांच्या पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त.**

---

मे. ग्रँड वेस्टर्न डिस्टीलरी प्रायव्हेट लिमिटेड, गट नंबर ई-१२/१, एम.आय.डी.सी. शिराळा, ता शिराळा, जिल्हा सांगली यांच्या प्रस्तावित ८० के.एल.पी.डी. धान्य आधारीत आसवणी प्रकल्प, १० के. एल. पी. डी. माल्ट स्पिरीट आसवणी प्रकल्प व आय.एम.एफ.एल. (Indian Made Foreign Liquor) आणि कंट्री लिकर उत्पादन प्रकल्पांची पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी बुधवार दिनांक ०९-१०-२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता मे. ग्रँड वेस्टर्न डिस्टीलरी प्रायव्हेट लिमिटेड, गट नंबर ई-१२/१, एम.आय.डी.सी. शिराळा, ता शिराळा, जिल्हा सांगली या कारखाना कार्यस्थळावर पार पडली. पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीस खालील समिती सदस्य उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ. राजा दयानिधी ,<br>जिल्हाधिकारी, सांगली. | - | अध्यक्ष |
| २. | श्री. जयवंत शं. हजारे,<br>प्रादेशिक अधिकारी, म.प्र. नि. मंडळ, कोल्हापूर | - | सदस्य |
| ३. | श्री. विद्यासागर वि. किल्लेदार,<br>उप प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि. मंडळ, सांगली. | - | आयोजक |

पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे इतिवृत्त पुढील प्रमाणे :-

सर्वप्रथम श्री. विद्यासागर वि. किल्लेदार, उप प्रादेशिक अधिकारी, म .प्र. नि. मंडळ, सांगली तथा पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे आयोजक यांनी जनसुनावणीसाठी उपस्थित सर्वांचे स्वागत केले व मा. अध्यक्षांच्या मान्यतेने जनसुनावणीस सुरुवात केली. त्यांनी सांगीतले की, कारखाना व्यवस्थापनाने प्रस्तावित प्रकल्पाबाबत १९ ऑगस्ट २०२४ रोजी सादर केलेल्या पर्यावरण

आघात मुल्यांकन नोटीफिकेशन २००६ नुसार प्रस्तावाच्या अनुषंगाने भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाकडे प्रस्ताव सादर केलेला होता त्या अनुषंगाने पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय यांनी त्यांना अटी व शर्ती घालून टी.ओ. आर. मंजूर केला असून त्यानुसार उद्योजकांने प्रारुप पर्यावरण मुल्यांकन अहवाल तयार करुन शासनाकडे सादर केला आहे व सदर नोटीफिकेशननुसार जनसुनावणी घेण्यात येत आहे. जनसुनावणीच्या ३० दिवसांपुर्वी म्हणजेच दि. ०९ सप्टेंबर २०२४ रोजी दै. सकाळ या मराठी व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया या इंग्रजी वर्तमानप्रत्रांमध्ये जाहीर सुनावणीची सूचना प्रसिध्द करण्यात आली होती.

सदर प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी तयार केलेल्या प्रारुप प्रस्तावित प्रकल्पाचा पर्यावरण मुल्यांकन अहवालाच्या प्रती मा. जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली; जिल्हा उद्योग केंद्र सांगली, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद सांगली; प्रादेशिक कार्यालय महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ-कोल्हापूर, झोनल कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण विभाग, मंत्रालय; न्यू सेक्रटरीयट बिल्डींग, तळमजला ईस्ट विंग, सिव्हल लाईन नागपूर ४४०००१; मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय,कल्पतरु पॉईट, तिसरा मजला, सिनेप्लॅनेट समोर सायन सर्कल, सायन पूर्व, मुंबई, मुख्याधिकारी, शिराळा नगरपंचायत शिराळा, तहसिलदार, तहसिल कार्यालय शिराळा, ग्राम पंचायत कार्यालय औंधी, भटवाडी, बेलदारवाडी, खेड, निगडी, कापरी, कदमवाडी, करमाळे, रेड भाटशिरगांव, तडवळे, पाडळी, उपवळे, बिऊर, पाडळीवाडी ता.शिराळा, जि. सांगली इ. ठिकाणी जनतेच्या अभ्यासांसाठी ठेवण्यात आले असल्याचे सांगीतले. सदरील प्रकल्पाबाबत जनतेच्या सूचना, हरकती, सूचना इ. मागविण्यात आलेल्या होत्या. प्रस्तावित प्रकल्पा संदर्भात आपल्या हरकती, सुचना असतील तर त्या आपण मांडू शकता तसेच समितीकडे लेखी सादर करु शकता. या जनसुनावणीचा उददेश प्रस्तावित प्रकल्पाची जनतेस माहिती देणे, त्याचा पर्यावरणावर होणा-या आघाताबाबत व त्यावर काय ऊपाययोजना करण्यात येणार आहे याची माहिती देणे व जनतेच्या सूचना, हरकती, टिका टिप्पणी यांची नोंद घेणे असा असून प्राप्त झालेल्या सूचना व्हीडीओ रेकॉर्डीगसहीत पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणीच्या इतिवृत्तासोबत

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय यांचेकडे सादर केल्या जातील. तसेच सुनावणी दरम्यान उपस्थित जनतेमार्फत केलेल्या हरकती, टिका टिप्पणी यांचे निरसन जनसुनावणी दरम्यान कारखान्याचे तांत्रिक सल्लागार यांचेमार्फत करण्यात येईल असे सांगीतले तसेच सदर पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती ही केवळ जनतेच्या सूचना, हरकती यांची नोंद घेणार असून प्रकल्प उभारणीबाबत कोणताही निर्णय सदरील समिती घेणार नाही असे सांगीतले.

यानंतर आयोजक श्री. विं. वि. किल्लेदार यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाबाबतची माहिती सादर करावी व ती माहिती शांतपणे ऐकूण उपस्थितांनी आपल्या हरकती, शंका, प्रश्न, टिका टिप्पणी आपले नाव व गाव सांगून उपस्थित कराव्यात व त्याचे पर्यावरण विषयक सल्लागार यांनी उत्तरे द्यावीत अशी विनंती केली.

यानंतर प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण तांत्रिक सल्लागार यांच्यावतीने प्रस्तावित प्रकल्पाबाबत स्लाईड शो व्दारे सादरीकरण करण्यात आले. यामध्ये प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, ठळक वैशिष्ठये, हवा निरिक्षण अहवाल, हवा नमुना तपासणी निष्कर्ष, ध्वनी निरीक्षण अहवाल, पृष्ठ भागावरील पाण्याचे नमुने स्टेशन तपासणी व निष्कर्ष, माती तपासणी ठिकाणे व त्याचे निष्कर्ष, सामाजिक सर्वेक्षण व त्याचे निष्कर्ष, पर्यावरण व्यवस्थापन योजना, हवा प्रदूषण व्यवस्थापन योजना, ध्वनी प्रदूषण व्यवस्थापन योजना, वृक्षारोपन, जल प्रदूषण नियंत्रण, धोका व आपत्ती व्यवस्थापन, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी प्रक्रिया, पर्यावरण व्यवस्थापन आराखडयांतर्गत खर्च, भांडवली गुंतवणूक, इमर्जन्सी टास्कफोर्स, सी.एस.आर. अंतर्गत खर्च, प्रस्तावित प्रकल्पाचे फायदे इ. बाबत माहिती देण्यात आली.

वरील सादरीकरणानंतर पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे संयोजक यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत जर कोणाचे प्रश्न, आक्षेप, शंका असतील तर त्या मांडाव्यात अशी विनंती केली. तद्नंतर खालीलप्रमाणे उपस्थित जनतेमार्फत प्रश्न, आक्षेप, शंका प्राप्त झाल्या.

१. **<u>श्री. विजय माळी, माजी सरपंच, भाटवाडी ता. शिराळा, जि. सांगली.</u>**

ग्रामीण भागात रोजगार नव्हता या भागामध्ये एम. आय. डी. सी. आल्यामुळे येथील लोकांना रोजगार मिळाला. उद्योजकांनी या ठिकाणी कारखाने उभा केल्यामुळे रोजगार मिळाला. परंतु मी आपल्या समोर काही गोष्टी सांगू इच्छितो या एम.आय.डी.सी मध्ये अनेक छोटे मोठे उद्योग आहेत त्यातील २० टक्के चालू आहेत व ८० टक्के बंद आहेत, दुसरा मुददा या उद्योगांमध्ये बाहेरील राज्यातील कामगार काम करत आहेत, स्थानिक लोकांना काम दिले जात नाही, एम. आय. डी. सी. तील उद्योगांनी आतापर्यंत गावांसाठी किंवा या परिसरामध्ये एक रुपयाही खर्च केलेला नाही, जन सुनावणी न करता, ग्रामस्थांना विश्वासात न घेता सर्व उद्योग उभा केलेले आहेत. आज आपण आम्हाला आमच्या अडचणी मांडण्याची संधी दिली याबददल मी आपले आभार मानतो. या प्रस्तावित प्रकल्पास आमचा विरोध नाही परंतु जे फायदे होणार आहेत ते आम्हाला मिळावेत.

२. **<u>श्री. विक्रम गजानन पाटील, राहणार-खेड, तालुका-शिराळा, जि.सांगली.</u>**

प्रस्तावित प्रकल्पाच्या जो इनव्हॉर्नमेंट ईम्पॅक्ट असेसमेंट ( ई. आय. ए.) बनविताना आम्हाला कोणालाही त्यांच्या विश्वासात घेतले नाही. त्यांनी प्रकल्पापासुन गावाचे अंतर किती किंवा आजुबाजुला असणारे पशुपक्षी किंवा मानवजातीला होणारे तोटे याचा विचार केला नाही. या प्रकल्पापासून ५०० मिटर अंतरावर धरणेगांव आहे, एक किलो मिटरवरील आमचे खेड गाव आहे. या प्रकल्पाबाबतची माहितीपत्र हे आमच्या ग्रामपंचायतीला मिळाले परंतु ग्रामसभा घेवून सरपंच व ग्रामसेवक यांनी ग्रामस्थांना या प्रकल्पाबददल पूर्णपणे माहिती दिलेली नाही, येथे जनसुनावणी आहे हे आम्हाला आज कळाले. प्रस्तावित प्रकल्पाला विरोध म्हणण्यापेक्षा या प्रकल्पापासून होणाऱ्या दुष्परिणामाचा विचार करण्यात यावा. प्रस्तावित प्रकल्पाच्या फायद्या तोटयांचाही सखोल विचार करावा धन्यवाद.

३. **श्री. सुनिल रघुनाथ पाटील, राहणार पेठ, ता-शिराळा, जि. सांगली.**

आताची पिढी सुसंस्कृत व सुशिक्षीत आहे, सगळेच औद्योगीकीकरणाचे समर्थन करणारे आहेत. येथे माझ्या गावातील जवळपास ७० ते ८० टकके लोक उपस्थित आहेत मी मागे बघतपण नाही त्यापैकी किती जणांना SO2 म्हणजे काय हे माहिती आहे त्यांनी हात वर करावेत असे सांगीतले, प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांनी माहिती देतांना SO2 म्हणजे काय याची माहिती दिलेली नाही. शरीरास हानीकारक आहे किंवा कसे याची माहिती दिली नाही. त्यावर आपण १०० टक्के नियंत्रण आणू किंवा नाही त्याबाबत सांगितले नाही म्हणजेचे तो हवेमध्ये कुठेतरी पसरणार. रोजगार निर्मीती व्हावी असे प्रत्येकाला वाटत असेल आजुबाजूला जी दोन गावे आहेत खेड आणि भटवाडी या दोन्ही गावाचे गावांच्या सेंटरला हा प्रकल्प येतो. या प्रकल्पाचा परिणाम शेतीवर व लोकांवर होणार आहे. त्याच्या विषयी १०० टक्के चर्चा झालीच पाहिजे, ग्रामपंचायतीने ग्रामसभा घेऊन जनसुनावणी आहे असे सांगितले पाहिजे, लोकांच्या प्रश्नाचे निवारण झाल्यावर जनसुनावणी घ्यावी, आजची जनसुनावणी तहकुब करावी असे माझे प्रामाणिक मत आहे. ज्यावेळी ग्रामसभा होईल त्यावेळी कंपनीचे प्रतिनिधी तेथे उपस्थित असावेत. स्थानिकांना रोजगारामध्ये प्राधान्य दिलेले नाही हे १०० टक्के सत्य आहे. वाकुर्डे बुद्रुक सुवर्ण योजना आमच्या गावात आलेली आहे. मी नोकरीसोडून शेतीसाठी इथे आलेलो आहे, एवढी येथे सुधारणा झालेली आहे, पाणी आलेले आहे. ज्या शिल्लक जमिनी आहेत त्याच्यामध्ये सुध्दा अशा प्रकारचे प्रकल्प येऊन नाशच होणार आहे. ही जनसुनावणी जनहिताची ठरणार नाही ती तहकूब करावी.

श्री. विद्यासागर व्ही. किल्लेदार, समिती आयोजक म्हणाले की, पर्यावरण जनसुनावणी समिती प्रकल्पाबाबत कोणताही निर्णय घेत नाही.

यावर मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष यांनी सांगितले की, प्रस्तावित प्रकल्पासाठी जन सुनावणी घेणे हा प्रोसिजरचा एक भाग आहे, प्रकल्पास मान्यता देणेबाबतचा निर्णय आम्ही समितीमधील लोक घेत नाही, आपले



सागर

जे काही म्हणणे आहे ते नोंद करुन त्याचे इतिवृत्त आम्ही शासनाकडे सादर करतो व याबाबतचा निर्णय शासन घेईल. दुसरी गोष्टी प्रोसिजरच्या क्रमाणे जेथे जेथे प्रकल्प उभा राहतो तेथे जनसुनावणीसाठी एक महिना अगोदर वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्दी द्यायची असते, त्याप्रमाणे एक महिना अगोदर वर्तमानपत्रामध्ये सूचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तरीपण आपली जी काही शंका असेल ती मांडा त्याचे निराकरण प्रकल्पांचे तांत्रिक सल्लागार करतील, त्यानंतर देखील तुम्हाला शंका असेल, जास्त माहिती हवी असेल तर प्रकल्पाचे तांत्रिक सल्लागार यांना आपण एक दिवस ग्रामपंयात मध्ये बोलवा ते जी काही माहिती आपणांस हवी असेल तर ती माहिती ते आपणांस देतील. सुनावणी दरम्यान प्रकल्पाबाबत निर्णय होत नाही. पर्यावरण विषयी आपल्या ज्या काही शंका, टिक-टिप्पणी, मत, मुददा मांडायचा असेल तर मांडा ते आम्ही शासनांस कळवू.

यावर श्री. सुनिल पाटील यांनी जनसुनावणीची लोकांना माहिती नाही ते आलेले नाहीत ते आले पाहिजे असे सांगितले.

यावर मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष यांनी एक महिन्यापुर्वी सूचना प्रसिध्द केली होती तरी पण आपणांस मुददे मांडायची असतील तर ते मांडा त्यानंतर पण आपले म्हणणे असेल तर लेखी द्या असे सांगितले व पर्यावरण सल्लागार यांनी लोकांनी पर्यावरण, आरोग्य इ. विषयी कशी काळजी घेणार याबाबत माहिती द्यावी अशी सूचना केली.

यावर श्री. पाटील यांनी आमचा औद्योगीकरणाला विरोध नाही परंतु या प्रकल्पाबाबत आम्हाला माहितीच नाही त्याबाबत कसे मत व्यक्त करणार असे विचारले. यावर मा. अध्यक्षांनी आम्ही आपल्या मताची इतिवृत्तामध्ये नोंद घेवू असे सांगितले.

यानंतर श्री. शरद शेटे, कारखान्याचे तांत्रिक संचालक यांनी सांगितले की, प्रस्तावित प्रकल्पाबाबतची सर्व माहिती आम्ही सर्व ग्रामपंचायतींकडे दिलेली आहे. तरीपण आपण ज्यावेळी ग्रामसभा असेल त्यावेळी आम्हाला बोलवा त्यावेळी आम्ही आपणांस माहिती देतो.

४. **सौ. वनिता मारुती सातपुते, सरपंच खेडगांव. ता-शिराळा, जि. सांगली.**

प्रस्तावित प्रकल्पामुळे पाणी प्रदूषण तसेच राखेचे प्रदूषण होणार आहे. आमच्या खेड गावाला प्रदूषणाचा त्रास होऊ नये, लोकांना धोका होऊ नये अशी दक्षता घ्या, आमची हरकत नाही. आजच्या पर्यावरण विषयक जनसुनावणी विषयी आम्हाला पत्र मिळाले आहे त्याबाबत आम्ही ग्रामसभेमध्ये गावक-यांची मिटींग घेऊन गावक-यांची संमती घेऊन काय ते आम्ही तुम्हाला कळविती.

श्री. शरद शेटे, प्रकल्पाचे तांत्रिक संचालक यांनी सांगितले की, संपूर्ण प्रकल्प शुन्य सांडपाणी निस्कासन पध्दतीचा अवलंबलेला, कारखाना परिसराच्या बाहेर एक थेंबही पाणी येणार नाही, दोन कोटी रुपये खर्च करुन बॉयलर सी. पी. यु. बसविणार आहे. आपल्या आरोग्याबाबत सांगायचे तर सी.एस.आर. फंडाची तरतूद केलेली आहे. त्यातून अडीच ते तीन कोटी रुपये खर्च करणार आहे.

प्रकल्पांचे तांत्रिक सल्लगार यांनी घनकचरा कारखान्याबाहेर गेला तर त्याचा तोटा कारखान्याला आहे. घनकच-यातुन त्यांचा खरा फायदा आहे. सी. पी. यु. मध्ये सांडपाण्यावर प्रक्रिया करणार आहे. स्पेंट वॉश हायली पोलूटेड आहे हे मान्य आहे पण त्यावर प्रक्रिया केली जाईल, पशुखाद्य बनविले जाईल. त्यामुळे सी. पी. यु. मधून सांडपाणी बाहेर सोडले तर त्यामधून कारखान्याचे नुकसान होणार आहे. दुसरे म्हणजे हवा प्रदूषणाबाबत सांगायचे तर जे सल्फर डॉय ऑक्साईड, नायट्रोजन डॉय ऑक्साईड, कार्बन डॉय ऑक्साईड हे सर्व इलेक्ट्रोस्टेटीक प्रेसिपिटेटरव्दारे नियंत्रीत केले जाईल. त्यासाठी कारखाना ५३.५९ कोटी रुपये खर्च करणार आहे. तसेच ३३ टक्के जागेवर हरित पट्टा विकसीत केला जाणार आहे. वायु प्रदूषण रोखण्यासाठी आठ ते साडे आठ हजार झाडे लावण्यात येणार आहेत. ज्यामुळे वायु प्रदूषण आणि ध्वनी प्रदूषण होणार नाही. हा कारखाना एकदम चांगल्या पध्दतीने चालविला जाईल याची आम्ही खात्री देतो कारण त्यासाठी करोडो रुपये गुंतवणूक करणार आहेत त्यामुळे सर्व



आगार

चांगलेच होईल व संमतीपत्रातील व पर्यावरण अनुमती बाबतच्या सर्व अटी पाळल्या जातील.

५. **श्री. महेश पाटील राहणार औंधी, तालुका शिराळा, जि. सांगली.**

या प्रस्तावित प्रकल्पास आमचा विरोध नाही, रोजगार निर्मिती होणार आहे यासाठी आमचे सहकार्य आहे. परंतु येथुन पाठीमागे जे प्लँट उभे राहिले त्यावर आपण काय कारवाई करणार आहात का, आम्ही म. प्र. नि. मंडळाकडे तक्रारी केलेल्या आहेत. या प्रकल्पास आमचा विरोध नाही परंतु स्थानिक लोकांस रोजगार मिळाला पाहिजे, त्यांचे आरोग्याशी न खेळता प्रकल्प करावा. प्रकल्पास आमचा विरोध नाही परंतु श्री. शेटे यांनी सांगितल्या प्रमाणे प्रकल्प प्रदूषण विरहीत करावा.

६. **श्री. स्वप्नील निकम, युवा सेना जिल्हा उप प्रमुख, शिराळा, जि. सांगली.**

या ठिकाणी श्री. महेश पाटील यांनी आता बाकीच्या उद्योगासंदर्भात जे प्रश्न उपस्थित केले, आम्ही मे. क्लॅरेंस बायो एनर्जी प्रा. लि. संदर्भात गेली दोन वर्षे वारंवार पत्र देऊन पुरावे देऊन कशाप्रकारे प्रकल्प बेकायदेशीर चालू आहे, सांडपाणी कशाप्रकारे बाहेर जाते हे दाखवूनही त्यांच्या कोणतीही कारवाई झाली नाही. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या संमतीपत्रातील अटींचे व शर्तीचे कोणत्याही प्रकारे पालन केले जात नाही. आपण हा प्रकल्प करताय चांगली गोष्ट आहे पण तो प्रस्तावित प्रकल्प रेड, ऑरेंज यापैकी कोणत्या कॅटेगरीत आहे हे सर्वांना सांगावे.

श्री. शरद शेटे, प्रकल्पाचे तांत्रिक संचालक यांनी सांगितले की, माझ्या कंपनीमधून एकही लिटर सांडपाणी डिसचार्ज होणार नाही, आम्ही ऑनलाईन मॉनिटरींग सिस्टीम बसविणार आहोत. त्याचा डिजीटल बोर्डवर प्रदूषणाबाबतचे दर्जा सतत आपणांस दिसत राहील व तो कोणीही जाता येता मेन गेट वरुन बघू शकते. आम्ही इ. एस. पी. इव्हॅपोरेशन प्लँट, सी.पी.यु. बसविणार आहे त्यानंतर कारखाना चालू करण्यास काही अडचण येणार नाही. प्रकल्प झिरो डिस्चार्ज आहे, ज्यावेळी आपणांस

सांडपाणी बाहेर येईल त्यावेळी आम्ही प्रकल्प बंद करु. केंद्रीय प्रदूषण मंडळाच्या गाईडलाईन्स प्रमाणे सर्व उपाययोजना आम्ही करणार आहोत.

यावेळी श्री. सुनिल रघुनाथ पाटील यांनी सांगितले SO2 जो काही निघणार आहे तुम्ही त्याची काही व्यवस्था करणार आहात किंवा तुम्ही म्हणल्याप्रमाणे साडे सात - आठ हजार झाडे लावणार आहात पुन्हा जो कार्बन मोनॉक्साइड, SO2 हे जे वायू निघणार आहेत त्याचा कशाप्रकारे तुम्ही बंदोबस्त करण्याच तुम्ही नियोजन करत आहात. येथे माझ्या वाडवडीलांची शेती आहे ज्यावर त्यांचा उदरनिर्वाह चालतो त्यांच्या भविष्याचे काय अशी विचारणा केली व ज्यांनी प्रकल्प हवा आहे व ज्यांना प्रकल्प नको त्यांची हात ऊंचावून मत व्यक्त करावे अशी विनंती केली.

यावर श्री. ज. शं. हजारे, सदस्य, पर्यावरण विषयक जनसुनावणी समिती यांनी सांगितले की, आम्ही आपले म्हणणे ऐकले आहे, त्याची नोंद आम्ही इतिवृत्तांमध्ये घेऊन ते आम्ही भारत सरकारच्या वने, पर्यावरण व हवामान बदल खात्याकडे सादर करु व ते प्रकल्पाविषयी निर्णय घेतील आम्ही समिती निर्णय घेत नाही, आम्ही जी माहिती सादर करणार आहे त्याची प्रत आपणांस दिली जाईल, ही माहिती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वेबसाईटवर प्रसिध्द केली जाते, ती आपण पाहू शकता, ही जनसुनावणी संपल्यानंतर आपणांस जर काही लेखी निवेदन द्यायचे असेल तर ते देऊ शकता.

७. **<u>श्री. अक्षयकुमार पाटील, शिराळा, जि. सांगली.</u>**

आपण माहिती सादर करताना गावाचे सर्वेक्षणामध्ये सर्वात जवळचे गाव भटवाडी आहे असे दाखविले आहे पण सर्वात जवळचे गाव खेड आहे. आपण हवेचा पाण्याचा सर्व्हे करताना जी गावांची नावे दाखविली त्यामध्ये खेड गावाचा उल्लेख नाही. प्रथम ५०० मिटरवरील गाव घेतले पाहिजे होते. आपण मुददामहून प्रदूषण झालेले गाव वगळलेले आहे कारण तेथे प्रदूषण झालेले आपणांस दाखवायचे नसेल.

कारखाना तांत्रिक सल्लागार यांनी सांगितले की, आम्ही ही विंड्रोज २०२४ मध्ये घेतलेली आहे. त्याच्यावरुन आम्हाला जो टी. ओ. आर. मिळाले आहे त्यानुसार १० किमी रेडीअसच्या आतील गावांची नावे दिलेली आहेत. सर्व लोकेशन्सचे जे रिपोर्ट असतात ते जवळपास सर्वांचे अॅवरेज रिपोर्ट असतात. मिनीस्टरी ऑफ इनव्हॉर्नमेंट अॅन्ड फॉरेस्ट च्या गाईडलाईन्स प्रमाणे केले जाते.

यावर श्री. ज. शं. हजारे, समिती सदस्य यांनी सदरचे लोकेशनचा सर्वे करुन ते इनव्हॉर्नमेंट इम्पॅक्ट असेंसमेंट (इ.आय.ए.) अहवालामध्ये समाविष्ठ करा अशी प्रकल्प सल्लागार यांना सूचना केली. तसेच जाहीर जनसुनावणीचे व्हीडीओ रेकॉर्डींग मिनीस्टरी ऑफ इनव्हॉर्नमेंट अॅन्ड फॉरेस्ट यांच्याकडे सादर करणार आहे, तेथे सर्व ऊहापोह होतो असे सांगितले.

८. **श्री. प्रदीप पंडीतराव पाटील, शिराळा, जि. सांगली.**

गट नंबर १९६ च्या गट नंबर २ मध्ये जो प्रकल्प उभा राहत आहे व १९६ च्या गट नंबर १ मधील मी शेतकरी आहे. आपण दररोज ५ लाखलिटर पाणी वापरणार अशी माहिती दिली व त्यापासून एक लिटरसुध्दा सांडपाणी बाहेर जाणार नाही असे म्हणता त्याची खात्री कोण देणार, भविष्यात जर पाणी बाहेर पडले तर त्याची त्यांच्यावर कारवाई कोण करणार त्यावेळी मी कोणाला भेटू शकतो.

यावर श्री. ज. शं. हजारे, समिती सदस्य यांनी सांगितले की, कोणताही उद्योग सुरु करताना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संमतीपत्र घ्यावे लागते, काही अटी व शर्ती घालून संमतीपत्र दिले जाते. प्रस्तावित प्रकल्पास संमतीपत्र देताना झिरो लिक्वीड डिस्चार्ज अटीवर संमतीपत्र दिलेले आहे. त्यातूनही त्यांनी सांडपाणी सोडले तर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सांगली येथील कार्यालयात आपण तक्रार देवू शकता.



आगर

यावर श्री. प्रदीप पाटील यांनी आम्ही आतापर्यंत झालेल्या प्रदूषणाबददल आम्ही ब-याच वेळा सांगली कार्यालयात गेलेलो आहे, सर्व मुददे मांडलेले आहेत त्याची कोणीही नोंद घेतलेली नाही.

यावर श्री. ज. शं. हजारे, समिती सदस्य यांनी सांगितले की, आताच मा. जिल्हाधिकारी यांनी आदेश दिलेले आहेत त्याप्रमाणे आपण तक्रारीबाबत यादी तयार करुन उप प्रादेशिक अधिकारी सांगली यांना भेटावे व कोणत्या ठिकाणी पाहणी करायची आहे ते त्यांना कळवावे त्यानुसार पाहणी करुन योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

९. **<u>श्री. खबाले सर. शिराळा, जि. सांगली.</u>**

आपण सूचना करतो त्या रेकॉर्डवर येतात आणि पुढे काय होते ते सर्वांनाच माहित आहे.

१०. **<u>श्री. निलेश दिलीप चव्हाण, राहणार भटवाडी, जि. सांगली.</u>**

ज्या आतापर्यंत तक्रारी झालेल्या आहेत त्यावर काय कारवाई झाली.

यावर श्री. हजारे यांनी सांगितले की पूर्वीचे जे अधिकारी होते त्याची बदली झालेली आहे. आता हे नवीन अधिकारी आले आहेत आता मा. अध्यक्ष साहेबानी सांगितल्याप्रमाणे पाहुन घेतील.

श्री. ब्रम्हदेव पाटील यांनी सांगीतले की, दुसरी गोष्ट म्हणजे यांनी कामगारांचा पगार सुद्धा दिलेला नाही याच्यावरती कोणी ॲक्शन घेतील का आम्ही तक्रार केलेली आमच्यावर उलट पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल झालेला आहे, आमच्यावर पोलिस स्टेशन ला खंडणी चे सुद्धा गुन्हे दाखल करतात आठ आठ महिने पोर काम करून सुद्धा कामाचा मोबदला देवू शकत नाही तर तुम्ही कंपनी आणताच कशाला.

त्यावर मा. अध्यक्षांनी आजची जनसुनावणी ज्या प्रकल्पासाठी घेतली जात आहे त्या प्रस्तावित प्रकल्पाविषयी बोलावे अशी विनंती केली. तसेच या परिसरामध्ये जे इतर उद्योग आहेत त्याबाबत ज्या काही लेखी



Rhsar

तक्रारी आहेत त्या तक्रारी ही जनसुनावणी संपल्यानंतर उप प्रादेशिक अधिकारी, सांगली यांनी स्विकाराव्यात त्या तक्रारीं आपल्या टीमसोबत वेरीफाय करा व दोषींवर नियमाप्रमाणे कारवाई करा अशी सूचना केली.

त्यानंतर श्री. शरद शेटे, प्रकल्पाचे तांत्रिक संचालक यांनी प्रस्तावित प्रकल्पामध्ये सर्व स्थानिक लोकांनाच काम दिले जाईल, टेक्निकल काम, कॉम्पुटर ऑपरेटर स्थानिक असतील तर त्यांना घेतले जाईल तसेच कामगार या भागातीलच घेणार व वेळेवर पगार देणार तसेच येथे जो काही पगार दिला जाईल तो शासनाच्या नियमाप्रमाणे किमान वेतन सर्वांना दिले जाईल त्यापेक्षा कमी देणार नाही असे सांगितले.

यावेळी मा. अध्यक्षांनी आपण प्रस्तावित प्रकल्पामध्ये जे तंत्रज्ञान वापरणार आहात ते तंत्रज्ञान वापरुन चालू असणारा दुसरा उद्योग या भागामध्ये असेल तर त्याचे नाव सांगा म्हणजे हे ग्रामस्थ ती कंपनी बघतील अशी विचारणा केली. यावर श्री. शरद शेटे, कारखाना तांत्रिक संचालक यांनी बारामती येथे आहे असे सांगितले व आपण बघू शकता असे सांगितले. यावेळी मा. अध्यक्षांनी प्रस्तावित प्रकल्पाच्या आजुबाजुच्या चार पाच ग्रामपंचायतीच्या सरपंचाना असे तंत्रज्ञान वापरणारा उद्योग दाखवा अशी श्री. शरद शेटे यांना सूचना केली.

११. **श्री. दिग्वीजय खबाले-पाटील, रा-खेड, ता-शिराळा, जि. सांगली.**

आमच्या गावचे पाणी एम. आय. डी. सी. मधील कंपन्यामुळे प्रदूषीत झालेले आहे, आम्ही वारंवार प्रदूषण थांबावे म्हणून तक्रारी करतो, केमिकलयुक्त पाणी आमच्या गावात येते ते थांबावे, माझी एक विनंती आहे जनसुनावणी झाल्यानंतर केमिकलने भरलेल्या तलावाची पाहणी करावी, बंधा-यांची नोंद नाही असे सांगितले.

यावर मा. अध्यक्ष महोदय यांनी इरिगेशनचा डिपार्टमेंटचा बंधारा आहे का, त्याचा कायदेशीर बाब तपासायला लावू असे सांगितले.

१२. **श्री. स्वप्नील निकम, युवा सेना जिल्हा उप प्रमुख, शिराळा, जि. सांगली.**

या प्रस्तावित प्रकल्पामध्ये बॉयलरसाठी इंधन म्हणून काय वापरणार आहे व वनीकरण किती करणार आहे ते सांगावे.

श्री. शरद शेटे, तांत्रिक संचालक यांनी प्रस्तावित प्रकल्पामध्ये बॉयलरसाठी इंधन म्हणून पूर्णपणे बगॅस वापरणार किंवा कॅशू नट केक वापरणार आहे व ३३ टक्के ग्रीन बेल्ट करणार आहे,

श्री. स्वप्नील निकम आतापर्यंत जेवढया उद्योगांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संमतीपत्र दिलेले आहे त्यातील एकाही कंपनीने ३३ टक्के वृक्ष लागवड केलेली नाही असे सांगीतले.

श्री. शदर शेटे, प्रकल्पाचे तांत्रिक संचालक यानी सांगितले की जेव्हा पर्यावरण परवाना मिळेल तेंव्हा पहिल्यांदा आम्ही झाडे लावण्याचे काम करणार त्यामुळे ज्यावेळी प्रकल्प चालू होईल त्यावेळी आपणांस हरित पट्टा तयार झालेला दिसेल असे सांगितले.

१३. **श्री. विजय माळी, माजी सरपंच, भटवाडी ता. शिराळा, जि.सांगली.**

प्रस्तावित प्रकल्पाच्या आजुबाजुच्या परिसरातील जी गावे आहेत त्या लोकांना रोजगार मिळणार आहे, बाकीच्या लोकांना, गावांना या प्रकल्पापासून काय फायदा आहे.

श्री. शरद शेटे, प्रकल्पाचे तांत्रिक संचालक यांनी सांगितले की, जो सी.एस.आर. फंड आहे त्यातील रक्कम वापरण्यासाठी आपण ठराव करुन आम्हांला कळवावे त्याप्रमाणे आम्ही तो फंड मा. जिल्हाधिकारी यांच्याकठे पाठवून त्यास रितसर परवानगी घेऊ, २०२५ साली कंपनी चालू होईल व २०२७ ला सी.एस.आर. खर्च करणार आहे व हे आम्ही कमीटमेंट केलेले आहे व सक्तीचे देखील आहे.

यावेळी श्री. जयवंत शं. हजारे, सदस्य यांनी अशा प्रकल्पांना सी.एस.आर. अंतर्गत खर्च करण्याची सक्ती केलेली आहे, त्यानुसार एकूण गुंतवणुकीच्या दिड टक्के रक्कम काही ठरवून दिलेल्या कारणांसाठी खर्च करणे बंधनकारक आहे, त्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांच्याकडून परवानगी घेवून दिले जाईल, ज्या मोठया कंपन्या आहेत ज्यांची जनसुनावणी झालेली आहे अशा कंपन्याना सी.एस.आर. कंपलसरी आहे असे सांगितले.

मा. जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक उद्योगाला सी. एस. आर. नसतो त्यावर मर्यादा असतात, मोठया प्रकल्पांना ज्यांची जनसुनावणी घेतली जाते अशा प्रकल्पांना सी.एस.आर. असतो, कंपनी सुरु झाल्यानंतर २०२७ मध्ये आपणांस विश्वासात घेऊन दिले जाईल.

१४. **श्री. अक्षय सतीश पाटील, रा-खेड. ता-शिराळा, जि.सांगली.**

प्रस्तावित प्रकल्पास जे पाच लाख लिटर प्रतिदिन पाणी लागणार आहे ते आपणांस कोण उपलब्ध करुन देणार आहे. आपण जर पाच लाख लिटर प्रतिदिन पाणी वापरले तर शेतक-यांनी काय करायचे.

श्री. शरद शेटे, प्रकल्पाचे तांत्रिक संचालक यांनी प्रस्तावित प्रकल्पास जे पाणी लागणार आहे ते पाणी एम.आय.डी.सी. उपलब्ध करुन देणार आहे व ते तलावातून न उचलता मोरणा नदीतून उचलले जाते अशी माझी माहिती आहे असे सांगितले.

यावेळी मा. अध्यक्ष महोदय यांनी पाण्याचे आरक्षण धोरण असते व त्यानुसार पिण्यासाठी, शेतीसाठी आणि उद्योगासाठी टक्केवारीनुसार पाणी वापराबाबत आरक्षण असते.

१५. **श्री. प्रदीप पंडीतराव पाटील, शिराळा, जि. सांगली.**

१९६ गट नंबर २ मध्ये आम्ही सहाजण आहोत आणि आम्हाला वाटेची अडचण आहे आम्हाला जाण्यायेण्यासाठी वाट नाही त्याची व्यवस्था करावी.

यावर मा. अध्यक्ष महोदयांनी त्या रस्त्यामध्ये उद्योग उभा होणार आहे का, प्रकल्प उभा झाल्यानंतर त्यांना शेताकडे जाण्यासाठी रस्ता आहे का अशी कंपनी व्यवस्थापनाकडे विचारणा केली, तसेच वहिवाटीचा रस्ता कोणता आहे असे विचारले.

श्री. प्रदीप पंडीतराव पाटील यांनी रस्ता बंद केलेला आहे असे सांगितले.

मा. अध्यक्षांनी सांगीतले की, शेतीला जाण्यासाठी रस्ता असलाच पाहिजे, तसेच प्रकल्पामुळे तुमचा रस्ता बंद होणार असेल तर तहसिलदार व एम.आय.डी.सी. पाहणी करतील, शेतीला जाण्यासाठी एक रस्ता असला पाहिजे असे धोरण आहे, दुसरा रस्ता असेल तर पर्यायी रस्ता देता येणार नाही परंतु कोठुनही शेतीला रस्ता नसेल तर आपणांस रस्ता देण्याची कार्यवाही करण्यात येईल.

यावेळी श्री. शरद शेटे, प्रकल्पाचे तांत्रिक संचालक यांनी नवीन रस्ता जर करणार असतील व त्या रस्त्यासाठी माझी मदत लागत असेल तसेच खर्च येणार असेल तर मी खर्च देण्यास तयार आहे असे सांगितले.

१६. **श्री. महेश पाटील, रा-औंधी, ता-शिराळा, जि. सांगली.**

मे. व्यंकटेश्वरा बायोरिफायनरी कंपनीची विहीर आमच्या औंधी गावाच्या पिण्याच्या पाण्यालगत आहे, गेली कित्येक वर्षे तेथे पाणी येत आहे त्याबाबत आम्ही पूर्वी देखील तक्रारी दिलेल्या आहेत. खालील बाजुस पाणी ओढले जात आहे कारण एम.आय.डी.सी. मध्ये पाण्याचा वापर जास्त आहे, लोकांकडून जागा घेऊन विहिरीत पाणी खेचत आहेत. त्याच्यासाठी आपण काही कारवाई करणार आहात का ते स्पष्ट करावे, कोण पाणी उचल करतो ती माहिती देतो, पाईप लाईन काढाव्यात.

यावर मा. अध्यक्ष महोदयांनी याबाबत लेखी निवेदन द्यावे असे सांगितले.

**१७. श्री. विजय माळी माजी सरपंच, भटवाडी ता. शिराळा, जि.सांगली.**

आमचा एक पारंपारिक मुद्या आहे. आमच्या भटवाडी आणि खेड गावाच्या यात्रा होतात. भटवाडीतून खेडला आम्ही गेली कित्येक वर्ष तीन पिढी लहान मोठे लोक तसेच पालख्या जात असतात, जर प्रस्तावित प्रकल्प झाला तर आम्हाला पर्यायी रस्ता कंपनीने व आपल्या स्तरावर करुन देण्यास विनंती आहे. दरवर्षी ५०० ते ७०० लोक पालखी घेऊन चालत जात असतात व जर प्रकल्प झाला तर आम्हाला जाण्यास मार्ग उपलब्ध होणार नाही व आमच्या चार ते पाच पिढयांची परंपरा आहे त्यास अडथळा निर्माण होईल त्यामुळे आताच योग्य कार्यवाही करावी.

श्री. शरद शेटे, प्रकल्पाचे तांत्रिक संचालक यांनी सांगितले की, एम.आय.डी.सी. चे प्लॉटींग करताना व लाईन आऊट प्रमाणे या कडेपासून त्या कडेपर्यंत पूर्ण रस्ता शेवटपर्यंत सोडलेला आहे. मी तुम्हाला तो रस्ता व्यवस्थित सरकारच्या मदतीने करुन देतो, बाँड्रीवरुन पूर्ण रस्ता आहे पण तो झाला नसेत तर सरकारच्या मदतीने व माझ्या काँन्ट्रीबुशनने करुन देऊ.

वरील चर्चेनंतर श्री. वि. वि. किल्लेदार, पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणीचे आयोजक यांनी सांगितले की, आम्ही प्रस्तावित प्रकल्पाबाबत जे सादरीकरण झाले व ज्या तळमळीने उपस्थितांनी प्रश्न मांडले त्या सर्वांची नोंद आम्ही घेतलेली आहे, मा. जिल्हाधिकारी महोदयांनी सुध्दा आदेश दिलेले आहेत त्याप्रमाणे दोन तीन दिवसांत आपल्या ज्या तक्रारी असतील त्यांची तुमच्या समोरच शहानिशा करुन जे उद्योग प्रदूषण करत असतील त्यांच्यावर नक्कीच कारवाई केली जाईल अशी मी ग्वाही देतो त्याची प्रत आपणांस व मा. जिल्हाधिकारी महोदयांना दिली जाईल आपण दिलेल्या तक्रारींची मला प्रत द्या एक आठवडाभरात त्याच्यावर कार्यवाही झालेली दिसेल असे सांगून पर्यावरण विषयक जनसुनावणीस उपस्थित राहील्याबददल सर्वांचे जनसुनावणी समितीतर्फे आभार मानले, तसेच मा. जिल्हाधिकारी महोदय आपले प्रश्न सोडविण्यासाठी स्वत: या जनसुनावणीस उपस्थित राहिले याबददल त्यांचे तसेच प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर व तहसिलदार शिराळा,

प्रकल्प प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण सेवा भावी संस्था, पोलीस प्रशासन यांचे आभार मानले. तसेच केंद्र शासन व राज्य शासनाच्या ज्या नवीन अटी आहेत त्या अटींचे पालन केल्याशिवाय प्रकल्प सुरु करण्यास परवानगी दिली जाणार नाही अशी ग्वाही दिली व मा. अध्यक्ष महोदयांच्या संमतीने पर्यावरण विषयक जाहीर जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर केले.

प्रस्तावित प्रकल्पाचा अनुषंगाने प्राप्त झालेल्या निवेदनाच्या प्रति सोबत जोडल्या आहे.

सदरच्या सुनावणीची कार्यवाही सकाळी १२.०० वाजता सुरू होऊन दुपारी २.०० वाजता संपन्न झाली.

**( विद्यासागर वि. किल्लेदार )**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी
समिती तथा उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सांगली

**( जयवंत शं. हजारे )**
सदस्य
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर

**( डॉ. राजा दयानिधी )**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा जिल्हा दंडाधिकारी , सांगली.